# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

## Maharashtra Water Resources Regulatory Authority (MWRRA)

9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cufffe Parade, Mumbai - 400005. Tel.: 2215 2019 Fax.: 2215 3765 E-mail: mwrra@mwrra.org


क्र. मजनिप्रा/२०१६/PRCL/KIDC/८९/२० दिनांक : १२/०१/२०१६

प्रति,

कार्यकारी संचालक,
कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ,
सिंचन भवन, दुसरा मजला, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) ४०० ६०३

**विषय : जांभिवली (चिखलोली) लघु पाटबंधारे योजना ता. अंबरनाथ, जि. ठाणे या योजनेच्या माती धरणाची उंची २.५० मी. ने वाढविण्याच्या कामास मजनिप्राची मान्यता घेणेबाबत.**

संदर्भ : का. सं, कोंपाविम, ठाणे यांचे पत्र क्र. कोंपाविम/तां५/चिखलोली/३७८९/सन २०१५ दि. २१/१२/२०१५

संदर्भिय पत्रान्वये कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांनी जांभिवली (चिखलोली) लघु पाटबंधारे योजना ता. अंबरनाथ, जि. ठाणे या माती धरणाची उंची २.५० मी. ने वाढविण्याच्या कामास मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

जांभिवली (चिखलोली) लघु पाटबंधारे योजनेस दि. २७/०२/१९७४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली असून १९७८ मध्ये बांधकाम झाले होते. सदर प्रकल्पाचा निव्वळ साठा २.२६ दलघमी व उपयुक्त साठा २.१९ दलघमी आहे. सदर प्रकल्पाचे लाभक्षेत्र १६६.४० हे असून फक्त ९७ हे सिंचन क्षेत्र निर्माण केले आहे. सदर प्रकल्पामधून अंबरनाथ महानगरपालिकेसाठी ६.०० एमएलडी पाणी आरक्षण असून वाढते शहरीकरणामुळे सदर आरक्षण १०.११ एमएलडी करण्याचे प्रस्तावित आहे. तदनुसार धरणाची उंची २.५० मी. वाढवून निव्वळ साठा ३.३७ दलघमी करण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामास रु. १६९६.१४ लक्ष खर्च अपेक्षित असून लाभव्यय गुणोत्तर ०.५५ आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ च्या कलम ११(च) नुसार प्राधिकरण मुख्यत्वे मा. राज्यपाल यांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशांच्या अधीन राहून तसेच एकात्मिक राज्य जल आराखड्याशी सुनिश्चिती करून प्रकल्पांना मान्यता देते. ठाणे जिल्ह्यामध्ये सिंचन अनुशेष नाही तसेच मा. राज्यपाल यांच्या दि. १०/०३/२०१५ रोजीच्या वर्ष २०१५-१६ च्या निदेशातील परिच्छेद १७ नुसार जो पर्यंत राज्य शासन चालू प्रकल्पांवरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम न होऊ देता निश्चित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने पुरेसा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देत नाही, तोपर्यंत नवीन प्रकल्पांचे काम हाती घेता येणार नाही.

कोंकणातील पश्चिम वाहिनी नद्यांचा जल आराखडा अद्यपि तयार झालेला नसल्याने व मा. राज्यपाल यांच्या वर्ष २०१५-१६ च्या निदेशाशी सदर प्रस्ताव सुसंगत नसल्याने सद्यस्थितीत तो प्राधिकरणाच्या कलम ११(च) च्या मान्यतेशिवाय परत पाठविण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश कुलकर्णी)
सचिव,

प्रत

१) प्रधान सचिव (जसंप्र व वि), जलसंपदा विभाग, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, हॉंगकॉंग बँक बिल्डींग, चौथा मजला, हुतात्मा चौक, मुंबई-४०० ०२३.

३) अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, कोपरी कॉलनी, ठाणे - ४०० ६०३.